ठेव अंशदान लेखाशीर्षाखालील
कामे सा.बां. विभागाच्या क्षेत्रीय
अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक बीडीजी ११९९/प्र.क्र.१९९ भाग-१/इमा. ३
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : ६/१२/२००५

## प रि प त्र क

राज्य शासनाचे बरेच विभागांना उदा. गृह विभाग ( तुरूंग/पोलिस), आदिवासी विकास विभाग, महसूल व वन विभाग व अन्य विभागाकडून त्यांच्या कामांकरीता केंद्र शासनाकडून/इतर संस्थांमधून विविध योजनेकरीता निधी प्राप्त होत असतो. हा निधी तदनंतर ठेव अंशदान म्हणून सा.बां.विभागाच्या संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या यांच्या अधिनस्त, कामे करण्यासाठी परस्पर वर्ग केला जातो. त्याची मंत्रालयीन स्तरावर सा.बां.विभागास काहीही माहिती असत नाही.. ही सर्व प्रक्रिया संबंधित विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांच्या स्तरावर होत असते. अशा सर्व योजनांचा उपभोक्त्या खात्यांकडून वेळोवेळी आढावा घेतला जातो. बहुतेक सर्व आढावा बैठकीत सा.बां.विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून योग्य प्रगती न झाल्याने/ उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने निधी प्राप्त होण्यास अडचण निर्माण झाल्याचे सांगण्यात येते व त्यावेळी सदर बाब मंत्रालयीन स्तरावर सा.बां. विभागास संदर्भीत केली जाते.

वरील निर्देशित बाब टाळण्यासाठी सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, ज्या ज्या वेळेला सा.बां.विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे संबंधित विभागामार्फत निधी सुपूर्द करण्यात येतो त्या वेळेस संबंधित बाब मंत्रालय स्तरावरील सा.बां. विभागाच्या निदर्शनास आणून द्याव्यात जेणेकरून संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना निर्गमित करून कामाचे संनियंत्रण करणे सोपे होईल.

( मा. अ. गांगुर्डे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग मंत्रालय, मुंबई
सर्व मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग,
सर्व अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ,
सर्व कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग.